महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/ १३९४७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २३/०६/२०२१

# परिपत्रक

**विषय :** कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या वार्षिक वेतनवाढीचे प्रदान (Release) अथवा उच्च वेतनश्रेणी लाभ, पदोन्नती इत्यादी लाभ मंजुर करण्याबाबत मार्गदर्शक सुचना.

**संदर्भ :** परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/१५६८२ दि. २८.०९.२०२०.

संदर्भित परिपत्रकान्वये कोवीड-१९ विषाणू च्या प्रसारामुळे उदभवलेली साथीच्या रोगाची परिस्थिती आणि निर्बंधांमुळे विभागीय परीक्षांचे आयोजन करण्यास होणारा विलंब विचारात घेवुन संबंधित कर्मचाऱ्यांच्या वार्षिक वेतनवाढीचे प्रदान, उच्च वेतनश्रेणी लाभ, पदोन्नती इत्यादी लाभ मंजुर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

२. कोवीड-१९ विषाणू प्रसाराच्या अनुषंगाने शासनाने घातलेल्या निर्बंधांमुळे सन २०२० मधील व्दितीय सत्रातील खालील विभागीय परीक्षा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

**व्दितीय अर्ध सत्र (जुलै २०२० ते डिसेंबर २०२०)**

| अक्र. | परीक्षा | मुळ वेळापत्रकानुसार परीक्षेचा नियोजित दिनांक |
|---|---|---|
| अ) | ९७ वी व्यावसायिक परीक्षा | ११/१२.०७.२०२० |
| ब) | १११ वी उच्चस्तर साप्रवि परीक्षा | ०८/०९.०८.२०२० |
| क) | १०३ वी उच्चस्तर लेखा परीक्षा | २६/२७/२८.०९.२०२० |
| ड) | १११ वी मराठी भाषा परीक्षा. | ०८.११.२०२० |

३. सबब, कोवीड-१९ विषाणू प्रसारामुळे विभागीय परीक्षा आयोजित करता न आल्याने कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होउ नये याकरीता, सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार कळविण्यात येते की, विभागीय परीक्षा उत्तिर्ण नसल्यामुळे ज्या कर्मचाऱ्यांची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे, अशा प्रकरणी उपरोक्त विभागीय परीक्षांच्या मुळ वेळापत्रकानुसार जो परीक्षेचा दिनांक आहे त्या अंतिम दिनांकाच्या लगत नंतरच्या दिनांकापासून संबंधित कर्मचाऱ्याची रोखण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ अदा (Release) करण्यात यावी.

४. शासनाकडून निर्बंध उठविण्यात आल्यानंतर उपरोक्त परीक्षांचे पुन:श्च आयोजन करण्यात येणार आहे. त्यानुसार जे कर्मचारी संबंधित विभागीय परीक्षा उत्तिर्ण होतील अशा कर्मचाऱ्यांना वरील सूचनांनुसार अदा करण्यात आलेली वेतनवाढ नियमित करण्यात येईल व त्यानुसार पुढील वेतनवाढी मिळण्यास ते पात्र असतील.

५. तथापि, जे कर्मचारी सदरची परीक्षा उत्तिर्ण होणार नाहीत असे कर्मचारी भविष्यात जी कोणती परीक्षा उत्तिर्ण होतील त्या परीक्षेचा दिनांक ग्राहय मानून प्रचलित नियमांनुसार त्यांची वेतनवाढ अदा करण्यात येईल आणि वरील सुचनांप्रमाणे अदा करण्यात आलेल्या वेतनवाढ प्रकरणी वसुली करण्यात येईल.

Scanned by CamScanner

६. परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/१५६८२ दि. २८.०९.२०२० मधील इतर तरतुदी अबाधित राहतील.

७. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**
१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत सस्नेह सादर :**
१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
२) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
४) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

**प्रत रवाना :**
१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

Scanned by CamScanner